महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ १९ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १४४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## अंबरनाथ : नगरसेवकांच्या ५९ जागांसाठी तब्बल ४००; तर नगराध्यक्ष पदासाठी १४ अर्ज

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूरः सोमवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अंबरनाथ आणि कुळगाव बदलापूर नगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवार आणि नगराध्यक्ष पदासाठी मोठी गर्दी झाली होती. अंबरनाथ शहरात ५९ जागांसाठी तब्बल ४०० अर्ज तर थेट नगराध्यक्ष पदासाठी १४ अर्ज आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जाहीर केली आहे. त्याचवेळी कुळगाव बदलापूर नगरपालिकेसाठी थेट नगराध्यक्ष पदासाठी ६ तर नगरसेवक पदासाठी २१७ अर्ज दाखल करण्यात आले आहेत. मंगळवारी उशिरापर्यंत दोन्ही पालिका मुख्यालयांमध्ये छाननी प्रक्रिया सुरू होती.**

अंबरनाथ आणि कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी १७ नोव्हेंबर रोजी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख होती. त्यामुळे सकाळपासूनच दोन्ही पालिका मुख्यालयांमध्ये रांगा लागल्या होत्या. अंबरनाथ नगरपालिकेत तर शेवटच्या दिवशी उमेदवारांची मोठी धावपळ पाहायला मिळाली. शेवटच्या क्षणापर्यंत राजकीय पक्षांचे एबी फॉर्म मिळवण्यात प्रयत्नशील असलेल्या उमेदवारांची धांदल उडाली.

पालिका मुख्यालयात प्रवेश मिळण्यापासून ते अर्ज दाखल करण्यापर्यंत उमेदवारांची धावाधाव पाहायला मिळाली होती. बदलापुरातही हीच परिस्थिती होती. गेल्या सात दिवसांपासून अर्ज भरण्याच्या प्रक्रियेत सहभागी न होणाऱ्या उमेदवारांनी शेवटच्या दिवशीच धाव घेतल्याने पालिका प्रशासनाचाही गोंधळ उडाला.




सोमवारी मध्यरात्री उशिरापर्यंत दाखल करण्यात आलेले अर्ज नोंदणी करण्याचे काम दोन्ही नगरपालिकांमध्ये सुरू होते. त्यामुळे किती अर्ज दाखल झाले, किती उमेदवारांनी किती अर्ज भरले याची माहिती थेट मंगळवारी दुपारनंतर उपलब्ध करून देण्यात आली. त्यानंतर सकाळी ११ वाजल्यापासून अंबरनाथ आणि कुळगाव बदलापूर नगरपालिका मुख्यालयात अर्ज छाननीची प्रक्रिया सुरू झाली. सोमवारी उमेदवारांची उडालेली झुंबड आणि दाखल करण्यात आलेले अनेक अर्ज यामुळे मंगळवारी सायंकाळी उशिरापर्यंत छाननीची प्रक्रिया सुरू होती. त्यामुळे सायंकाळी सहा वाजेपर्यंत कुळगाव बदलापूर आणि अंबरनाथ अशा दोन्ही पालिकांची वैध उमेदवारांची यादी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून जाहीर करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे उमेदवारांची धाकधुक कायम होती. अंबरनाथ नगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार सोमवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ५९ जागांसाठी एकूण ४०० अर्ज दाखल करण्यात आले होते. तर नगराध्यक्ष पदासाठी १४ अर्ज दाखल करण्यात आले होते. कुळगाव बदलापूर नगरपालिकेत नगरसेवक पदासाठी शेवटच्या दिवशी १३० तर एकूण २१७ अर्ज दाखल करण्यात आले. त्यात नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते.

**अंबरनाथ नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेकडून (शिंदे गट) मनिषा वाळेकर, भाजपकडून तेजश्री करंजुले, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून अश्विनी पाटील, शिवसेना (ठाकरे गट) अंजली राऊत, काँग्रेसकडून नूतन प्रदिप पाटील या प्रमुख उमेदवारांनी अर्ज दाखल केले. तर बदलापुरात भाजपकडून रूचिता घोरपडे, शिवसेनेकडून (शिंदे गट) वीणा म्हात्रे, आम आदमी पार्टीकडून आस्था मांजरेकर, शिवसेना ठाकरे गटाकडून प्रिया गवळी, वंचित बहुजन आघाडीकडून रश्मी गवाणे यांनी तर मनसेच्या संगिता चेंदवणकर यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला.**

## लक्षवेधी



### कल्याणमध्ये मीटरप्रमाणे रिक्षा सुरु

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आरटीओ यांच्या निर्देशानुसार कल्याण रेल्वे स्टेशन पश्चिम मेन रिक्षा स्टॅण्ड येथे टेरीफ मिटर पध्दतीने रिक्षा प्रवासाला आजपासून सुरवात करण्यात आली. यावेळी रिक्षा चालक मालक असोसिएशन कल्याण शहर अध्यक्ष प्रणव पेणकर, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रशांत सुर्यवंशी, प्रियांका सागणकर, अक्षया बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मीटरप्रमाणे रिक्षा सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

बाईक टॅक्सी, ओला उबर कंपनी प्रवासी अँप वाहतुक स्पर्धा तोड देण्याकरिता रिक्षा चालकांचा व्यवसाय धंदा अबाधित व टिकून राहण्यासाठी रिक्षा चालकांच्या हिताकरीता संघटना म्हणून टेरीफ मिटर पध्दतीने रिक्षा वाहतुकसेवेला आम्ही प्रोत्साहन देत असल्याचे प्रणव पेणकर यांनी सांगितले.

तर आजपासून कल्याण शहर वासियांसाठी प्रायोगिक तत्वावर मीटरप्रमाणे रिक्षा स्टेंड सुरु केला आहे.यामध्ये मीटरप्रमाणे प्रत्येक प्रवाशांना नेण्यात येईल. यासंबंधी काही तक्रार असल्यास 9423448824 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रशांत सुर्यवंशी यांनी केले. यावेळी रिक्षा चालक मालक असोसिएशनचे कार्याध्यक्ष संतोष नवले, उपाध्यक्ष जितेंद्र पवार, शगीर शेख, बंडू वाडेकर, भाजपा वाहतूक संघटनेचे अध्यक्ष विल्सन काळपुंड आदी पदाधिकारी उपस्थित होते.



### कुंरूद येथे घरकुल लाभार्थ्यांना चावीचे वाटप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा दि. १८ (प्रतिनिधी )**

भिवंडी तालुक्यातील गोदाम पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व चार गांव पाड्यात विस्तार असलेल्या कुंरूद गृप ग्रामपंचायत हद्दीतील घरकुलांचे बांधकाम पुर्ण करणाऱ्या नागरिकांना घरकुलांच्या चावीचे ऊत्साहात वाटप करण्यात आले. प्रधानमंत्री जन-मन, ग्रामीण केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत तालुक्यातील कुंरूद गृप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कुरुंद,वाफाळे,दळेपाडा,वाहुली येथील १८० आदीवासी नागरीकांना शासनाकडून घरकुले मंजूर झाली असुन त्यापैकी १०० घरकुलांचे वेळेत बांधकाम पुर्ण करण्यात आले आहे. त्या घरकुल लाभार्थीचां गृहप्रवेश व चावी प्रदान करण्याचा कार्यक्रम मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी उपस्थीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती विलास पाटील यांनी घरकुल योजनेची माहिती देऊन उपस्थीत लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर श्रीकांत गायकर यांनी देशाचे पंतप्रधान नरेन्द्र मोदी हे प्रत्येकाला घर हा दीलेले शब्द पाळत असुन त्यांनी घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात थेट निधी देऊन विलंब आणी भ्रष्टाचाराला आळा घातल्याचे आपल्या भाषणात सांगितले. यावेळी सरपंच दीपाली केदार, उपसरपंच निकीता जाधव, ग्रामपंचायत सदस्य योगेश (बंटी) पाटील, भाई पाटील, श्रीकांत गायकर, संदीप काठोळे, जान्हवी पाटील, विशाखा भोईर, भावना सांबरे, रेश्मा वाघे, सुनील मोरे, ग्रामपंचायत अधीकारी नितीन देशमुख सह कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती विलास पाटील, उद्योजक, दिलीप केदार, निकेश विशे, विनोद पाटील, जगदीश पाटील, मुकेश जाधव उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते घरकुल लाभार्थ्यांना चावीचे वाटप करण्यात आले.तर ग्रामपंचायत हद्दीतील गावामधील आदीवासी नागरीकांना घरकूल मंजुरीसाठी लागणाऱ्या ऑनलाईन कागदपत्रांसाठी संपूर्ण ग्रामपंचायत कमीटी, ग्रामविकास अधिकारी नितीन देशमुख ग्रामपंचायत कर्मचारी पंकज जाधव, रवींद्र घोडविंदे, व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली त्यांचे यावेळी नागरीकांकडुन कौतुक करण्यांत आले.

## शिवसेना तालुकाप्रमुख महेश पाटील यांची भाजपत घरवापसी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण : आगामी महापालिका निवडणुकीची चाहूल लागताच कल्याण–डोंबिवलीतील राजकीय वातावरण चांगलेच वाढले आहे. विरोधी पक्षातील प्रभावशाली नेते आणि पदाधिकाऱ्यांसह एकमेकांच्या पक्षातील बड्या नेत्यांनाही आपल्या गोटात आणण्यासाठी भाजप आणि शिवसेनेमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू आहे. या घडामोडीत आज आणखी एक महत्त्वाची भर पडली. शिवसेनेचे तालुकाप्रमुख महेश पाटील यांनी आज परत भाजपमध्ये घरवापसी केली. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमूख उपस्थितीत महेश पाटील यांनी हा भाजप प्रवेश केला आहे.**



कल्याण डोंबिवलीत आज सकाळपासूनच भाजपमध्ये इनकमींगचा धडका सुरू आहे. आज सकाळी शिवसेनेतीलच युवा पदाधिकारी अनमोल म्हात्रे यांनी आपल्या समर्थकांसह प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये दाखल झाले. त्याला अवघे काही तासही उलटत नाहीत तोच भाजपने आपल्या महायुतीतील मित्रपक्ष शिवसेनेला आणखी एक धक्का दिला. कल्याण ग्रामीण भागातील मोठे प्रस्थ आणि पूर्वाश्रमीचे भाजप पदाधिकारी महेश पाटील यांनी आज परत भाजपमध्ये प्रवेश करत एकच खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्यासह माजी नगरसेविका डॉ. सुनिता पाटील, सायली विचारे, माजी परिवहन सदस्य संजय राणे, संजय विचारे यांनी आपल्या समर्थकांसह भाजपात प्रवेश केला तर मला व माझ्या मुलाला मारण्याची सुपारी देणारा मोक्काचा आरोपी कुणाल पाटील, याला मोक्का मधून क्लीन चिट दिली आहे. आमच्या पक्षातील नेते मंडळी कुणाल पाटील याला सपोर्ट करत असल्याने मी दडपणामध्ये होतो. श्रीकांत शिंदे यांना सांगितलं होतं की कुणाल पाटील हा फिरतोय आणि त्यांचे काका वंडार पाटील यांनी माझ्या मुलाला आणि मला मारण्याची धमकी दिली होती. त्यावर पक्षाकडून मला काही समाधानकारक मदत मिळाली नाही. मात्र आमच्या पक्षातले लोक त्यांना सपोर्ट करत आहेत म्हणून आज भाजपामध्ये प्रवेश केल्याचे महेश पाटील यांनी सांगितले.

## ठाण्यातील बीएसयुपी सदनिकाधारकांना मुद्रांक शुल्कात सवलत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील जे.एन.एन.यु. आर.एम. आणि बी.एस.यू.पी. योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना सदनिका देण्यात येतात. मात्र, आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे त्यांना एक टक्के मुद्रांक शुल्कात सवलत देऊन प्रतिदस्त १०० रुपये आकारण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. या निर्णयाचा फायदा ठाणे महापालिका क्षेत्रातील ६३४३ गरीब कुटुंबांना होणार आहे.

दरम्यान, यापुर्वी एक टक्का मेट्रो सेवेवरील अधिभार भरावा लागत होता. त्यातही गेल्यावर्षी सवलत देण्यात आली. अनेक आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांकडे स्वतःचे घर नसते. अशा नागरिकांसाठी केंद्रशासन, राज्य शासन आणि ठाणे महापालिका यांच्यामाध्यमातून जे.एन. एन.यु.आर.एम आणि बी.एस.यू.पी. योजनेंतर्गत सदनिका बांधून देण्यात येतात. आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना परवडेल अशा किमतीत ही घरे त्यांना देण्यात येतात.

**आर्थिक दुर्बल घटकातील कुटुंबांना मिळणाऱ्या सदनिकांकरीता प्रत्येकी ५६ हजार ते १ लाख ३४ हजार इतका अधिभार भरावा लागणार होता. परंतु हे रहिवासी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून ते मजुरीची कामे करतात. त्यामुळे त्यांना सदनिका घेताना करारनामा दस्त नोंदणीचा मुद्रांक शुल्क अधिभार भरणे परवडत नाही. ही बाब विचारात घेऊन या योजनेंतर्गतच्या शहरी गरीबांकरिता एक टक्के मुद्रांक शुल्क अधिभारात सवलत देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. ही सवलत देतानाच त्यासाठी प्रतिदस्त १०० रुपये आकारण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणाही त्यांनी केली. या निर्णयाचा फायदा ठाणे महापालिका क्षेत्रातील ६३४३ गरीब कुटुंबांना होणार आहे.**

## प्रक्रीयेविना मलनिस्सारणाचे सांडपाणी सोडल्यास कारवाई - प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे:** राज्यातील सर्वच मलनिस्सारण प्रकल्पांची तपासणी केली जाणार असून त्याठिकाणी प्रक्रीयेविनाच सांडपाणी वाहीनीतून सोडण्यात येत असेल तर, संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तसेच त्यांची मलनिस्सारण वाहिन्यांची जोडणीही तोडण्यात येईल, असे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना सांगितले. ठाणे महापालिकेच्या कै. अरविंद पेंडसे सभागृहात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी मंगळवारी बैठक घेऊन विविध विषयांचा आढावा घेतला. यावेळी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव हे उपस्थित होते. या बैठकीनंतर कदम यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मलनिस्सारण प्रकल्पांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळांकडूनही नाहरकत दाखला देण्यात येतो आणि त्यानंतर पालिका संबंधित बांधकामांना रहिवास प्रमाणपत्र देते. त्यामुळे हे प्रकल्पांची जबाबदारी महापालिकेची जितकी आहे, तितकीच प्रदुषण नियंत्रण मंडळाचीही आहे. यामुळेच राज्यातील सर्वच मलनिस्सारण प्रकल्पांची तपासणी केली जाणार आहे, असे कदम यांनी सांगितले. मलनिस्सारण प्रकल्प असतानाही त्याची अंमलबजावणी केली जात नाही आणि प्रक्रीयेविनाच सांडपाणी वाहीनीतून सोडण्यात येते. असे तपासणीत आढळून आले असेल तर, संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तसेच त्यांची मलनिस्सारण वाहिन्यांची जोडणीही तोडण्यात येईल, असे कदम यांनी स्पष्ट केले.



## शहापूर : हजारो घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते थकले

### तब्बल ८ हजार ६५८ घरकुले अपूर्णावस्थेत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर :** शासनाच्या प्रधानमंत्री व जनमन आवास योजनेतील घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते महिन्याभरापासून शासनाकडे थकल्याने शहापूर तालुक्यातील तब्बल ८ हजार ६५८ घरकुले अपूर्णावस्थेत आहेत. शासन दरबारी हेलपाटे मारूनही घरकुलांचे हप्ते मिळत नसल्याने लाभार्थ्यांच्या पदरी घोर निराशा आली आहे. शासनाच्या या उदासीन धोरणामुळे उसनवारी करून घेतलेले बांधकामाचे सिमेंट, विटा, रेती या साहित्याची रक्कम फेडायची कशी असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे.त्यातच घरकुलाच्या उघड्या छताखाली पोटाची भूक भागवण्या बरोबरच उसनवारी फेडण्यासाठी रोजगाराच्या शोधात त्यांच्यावर स्थलांतर करण्याची वेळ आली आहे. लाभार्थ्यांसमोर निर्माण झालेल्या या अडचणीमुळे घरकुल कधी पूर्ण होणार असा प्रश्न निर्माण झाला असून रखडलेले हप्ते तात्काळ देण्याची मागणी लाभार्थ्यांकडून केली जात आहे. शहापूर तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींमध्ये प्रधानमंत्री व जनमन आवास योजनेंतर्गत ९ ७२८ घरकुले एक वर्षांपूर्वी मंजूर झाली आहेत. योजनेतील घरकुलांसाठी चार हप्त्यांमध्ये एक लाख वीस हजार तर जनमन आवास योजनेतील घरकुलांसाठी दोन लाख रुपये तीन हप्त्यांमध्ये आवश्यक प्रक्रिया पार पडल्यानंतर कामाच्या स्थितीनुसार लाभार्थ्यांना देण्यात येतात.

**हा प्रश्न फक्त ठाणे जिल्ह्याचा नसून संपूर्ण राज्याचा असल्याचे सांगून शासनाच्या प्रणालीमध्ये बदल झाला असल्याने हप्त्यांसाठी विलंब झाल्याचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे विस्तार अधिकारी संतोष पांडे यांनी सांगितले.**






## संपादकीय

# राजकारणाचा पोत बिघडतोय

लोकशाही ही केवळ निवडणुका, सत्तांतर किंवा पक्षबदल यापुरती मर्यादित नसते; ती मूल्यांची, आचारसंहितेची आणि राजकीय संस्कृतीची एक सतत सुरू राहणारी प्रक्रिया असते. मात्र अलीकडच्या काळात महाराष्ट्रासह देशभरातील राजकारणाचा पोत बिघडत चालल्याची जाणीव अधिक तीव्र होत आहे. एकेकाळी विचारधारा, कार्यकर्त्यांची निष्ठा, आणि जनसेवेची तळमळ हे राजकारणाचे प्रमुख आधारस्तंभ मानले जात. पण आता त्यांची जागा घेतली आहे सत्तेचा हव्यास, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि क्षणाक्षणाला बदलणारे equation. पक्षातल्या फोडाफोडी, बळीभाव राजकारण, राजकीय वैरातून होणाऱ्या सूडकारवाया यामुळे सार्वजनिक जीवनातील संस्कारच कोमेजलेत. निर्वाचन हा लोकशाहीचा महोत्सव मानला जातो. पण आज निवडणुका म्हणजे केवळ पैशांची उधळण, सोशल मीडियावरील भ्रमजाळ आणि जात-धर्मांच्या समीकरणांची गणिते. मतदारांना विकासाच्या आश्वासनांनी खुणावण्यापेक्षा विरोधकांना कसे घेरता येईल याकडे अधिक लक्ष. संवादाचा सूर घसरत चालला आहे. सभागृहातील चर्चा हे तर दूरच, राजकीय टीका-टिप्पणीही आता वैयक्तिक पातळीवर उतरली आहे.

या सर्व प्रक्रियेत खरा तोटा होत आहे तो सामान्य जनतेचा. कारण राजकारणाच्या या बिघडलेल्या पोतामुळे विकासकामे दुय्यम ठरत आहेत. पक्षांतरांच्या खेळात स्थानिक प्रश्न धुळीस मिळतात. प्रशासन अस्थिर होते आणि जनतेचा लोकशाहीवरील विश्वास डळमळू लागतो. ही स्थिती बदलायची असेल, तर राजकारणी आणि मतदार— दोघांनीही आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. राजकारण्यांनी मूल्याधिष्ठित नेतृत्वाचा आदर्श ठेवावा आणि मतदारांनी झोपडीत येणाऱ्या क्षणिक लाभांपेक्षा दूरगामी विकासाला प्राधान्य द्यावे. सार्वजनिक जीवनाला शिस्त, संवादाची सभ्यता आणि कार्यसंस्कृतीची नव्याने ओळख करून द्यावी. लोकशाहीचा पोत शाबूत ठेवणे ही एकत्रित जबाबदारी आहे. अन्यथा येणाऱ्या पिढ्यांना आपण घसरत्या मूल्यांचाच वारसा देऊन जाणार आहोत.

# कल्याण डोंबिवली आणि ठाणे पालिकेवर आगरी कोळी समाजाचाच महापौर ; अन्यथा दुसरा विचार - कोळी महासंघाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण येथे कोळी महासंघ (ठाणे जिल्हा) आयोजित पदनियुक्ती सोहळा कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा आमदार रमेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. महासंघाचे उपनेते देवानंद भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण पश्चिमेतील समेळ मंगल कार्यालय येथे हा सोहळा अत्यंत यशस्वी ठरला. यामुळे कोळी महासंघाच्या कार्यकर्त्यांना कल्याण येथे एक नवी दिशा मिळाली. यावेळी महासंघासाठी सक्रियपणे कार्यरत असणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांची विविध महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती करण्यात आली. तर ठाणे, कल्याण डोंबिवली महापालिकेवर आगरी



कोळी समाजाचाच महापौर बसला पाहिजे अन्यथा दुसरा विचार करावा लागेल असा इशारा कोळी महासंघाच्या वतीने राजकीय पक्षांना देण्यात आला. या कार्यक्रमात कोळी महासंघ कार्याध्यक्ष प्रकाश बोबडी, चिटणीस राजहंस टपके, सहसचिव सतीश धडे, राज्य कार्यकारिणी सदस्य सुरेश पाटकर, युवा प्रदेशअध्यक्ष चेतन पाटिल, तसेच सुभाष बाबडे, काशिनाथ बामगिने, सतीश देशोकर, भावेश पाटील, सुभाष कोळी, रवींद्र भंडारी, हनुमान कोळी, दशरथ पाटील, ज्ञानेश्वर भोईर, राजू कोट, भीमसेन पाटील आदी मान्यवरांसह इतर अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी रमेश पाटील यांनी कार्यकर्त्यांना महासंघाची ताकद अधिक बळकट करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. तसेच समाजाचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रभावी रणनीती आखण्याबाबत आणि कोळी समाजासाठी राजकीय प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याच्या महत्त्वाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन करून कार्यकर्त्यांना पुढील कामकाजासाठी योग्य दिशा देण्यात आली. कोळी महासंघाचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावशाली करण्यासाठी कार्ययोजनेवर अधिक लक्ष केंद्रित करणे, महासंघाच्या ताकदीत वाढ करण्यासाठी नवीन युवा व महिला सदस्यांना जोडणे, त्यांना सक्रिय करणे आणि गावपातळीपर्यंत संघटनात्मक जाळे विणणे महत्त्वाचे आहे. ज्यामुळे महासंघ खऱ्या अर्थाने समाजाचा आधारस्तंभ बनेल असे रमेश पाटील यांनी सांगितले.

कोळी महासंघाचे उपनेते देवानंद भोईर यांनी आगरी कोळी समाजात आता एकजूट झाली आहे. महापालिका निवडणुका जवळ आल्या असून मुंबई ठाणे जिल्ह्यात आगरी कोळी समाजाची लोकसंख्या लक्षणीय आहे. जिल्ह्याच्या विकासात देखील आगरी कोळी समाजाचा मोलाचा वाटा आहे. मात्र आगरी कोळी समाजातील लोकप्रतिनिधींना महापौर पद दिले जात नाही, डावलले जाते अशी खंत व्यक्त केली. पुढे बोलताना आगरी कोळी समाजातील लोकप्रतिनिधीमधूनच महापौर नियुक्त करावा अन्यथा विचार करावा लागेल असा इशारा राजकीय पक्षांना दिला.

## ठाण्यातील सरकारी शाळांमध्ये डिजिटल शिक्षण परिवर्तन !

# ॲमेझॉन आणि पाय जॅम फाऊंडेशनचा उपक्रम सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे/दि. 18**

ॲमेझॉन आणि पाय जॅम फाऊंडेशन यांनी ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागासमवेत मिळून ठाण्यात एक समग्र डिजिटल शिक्षण उपक्रम सुरू केला आहे, ज्याचा उद्देश २१व्या शतकातील कौशल्यांसाठी टिकाऊ आणि सर्वसमावेशक शिक्षण व्यवस्था उभारणे हा आहे.

19.11.2025 रोजी ठाणे महानगरपालिका शाळा क्र. ६५, येऊर येथे नुकतीच स्थापित केलेल्या "Amazon Think Big Space" चे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सचिन सांगळे उपायुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे, मा. श्री. कमलाकांत म्हेत्रे - शिक्षणाधिकारी-प्राथमिक शिक्षण विभाग, ठाणे महानगरपालिका, मा. अमेझॉन वेब सर्व्हिसेस (AWS) चे कॅमरॉन इवान्स - डिरेक्टर-एपीएसी डीसीपीडी आणि पाय जॅम फाऊंडेशन चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शोएब दार, आणि ठाणे महानगरपालिका शाळा क्र. ६५, येऊर च्या मुख्याध्यापिका तसेच सर्व शिक्षकगण आणि विद्यार्थी उपस्थित होते. या भागीदारीतून ठाणे महानगरपालिकेतील ९ शाळांमध्ये शिक्षकांच्या नेतृत्वाखाली चालवले जाणारे Amazon Think Big Spaces आणि STEM Corners या प्रयोगशाळांमधून ९०० हून अधिक विद्यार्थ्यांवर सकारात्मक परिणाम होईल. या प्रयोगशील आणि नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून (hands-on) आणि अनुभवाधारित पद्धतीने शिकण्यास प्रवृत्त करतील. स्थानिक कौशल्य विकासावर लक्ष केंद्रीत ठेवून, अभ्यासक्रमामध्ये संगणकीय विचारशक्ती (Computational Thinking) आणि डिझाईन थिंकिंग यांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे विद्यार्थी त्यांच्या परिसरातील समस्यांवर उपाय शोधू शकतील आणि तंत्रज्ञानाचा वापर करून INNOVATOR बनू शकतील. सदर उपक्रमाद्वारे फक्त पायाभूत सुविधा निर्माण न करता, शिक्षकांच्या क्षमतेच्या विकासावरही विशेष भर दिला जात आहे. ICT आणि इतर सर्व विषयांतील एकूण २५० शिक्षकांना सहभागी उपक्रमातील भागीदार यांच्या सहकार्याने संगणक विज्ञान व कोडिंगचे प्रशिक्षण दिले जाईल, जेणेकरून ते शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण डिजिटल शिक्षण प्रभावीपणे पोहोचवू शकतील. या उपक्रमामुळे सुमारे ७,५०० विद्यार्थ्यांपर्यंत थेट परिणाम पोहोचेल. NEP 2020 च्या महत्त्वाकांक्षांनुसार डिजिटल शिक्षणाचा प्रसार अपेक्षित असला तरी महाराष्ट्रात आजही केवळ ४०.८५% शाळांमध्ये कार्यरत संगणक उपलब्ध आहेत. विशेषतः मुली आणि वंचित समुदायातील विद्यार्थी यामुळे अधिक बाधित होतात. हा उपक्रम अशा प्रकारच्या आव्हानांना थेट सामोरे जात असून, सरकारी शाळांना डिजिटल शिक्षण व संधीची सक्रीय केंद्रे बनवण्याचा प्रयत्न करत आहे.

# चार वर्षांच्या चिमुरडीवर भटक्या कुत्र्याचा हल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** घराबाहेरील अंगणात खेळत असलेल्या चार वर्षांच्या चिमुरडीवर पिसाळलेल्या एका भटक्या कुत्र्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना पश्चिमेकडील माता रमाबाई आंबेडकर नगर परिसरात सोमवारी दुपारी २ च्या सुमारास घडली. या घटनेनंतर परिसरात घबराट पसरली आहे.

कुत्र्याने अचानक झडप घेत तिच्या उजव्या मांडीचे दोन ठिकाणी लचके तोडले तसेच तिच्या हातालाही चावा घेतला. तिच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असून तिची प्रकृती स्थिर असल्याचे तिच्या वडिलांनी सांगितले. माता रमाबाई आंबेडकर नगर हा बैठ्या चाळीचा परिसर असून दुपारच्या सुमारास चिमुरडी घराबाहेर खेळत असताना हा हल्ला झाला. शेजाऱ्यांनी धावत जाऊन तिची सुटका केली, मात्र तोपर्यंत कुत्र्याने पायाचे लचके तोडत गंभीर इजा केली होती. दरम्यान, संबंधित भटक्या कुत्र्याला रेबीजची लक्षणे दिसत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. घटनेची माहिती मिळताच केडीएमसीच्या आरोग्य विभागाचे पथक कुत्र्याला पकडण्यासाठी दाखल झाले. परिसरातील नागरिकांनी या कुत्र्याचा तातडीने बंदोबस्त करून अशा घटनांना आळा घालण्याची मागणी केली आहे.



# ऑरी

# मत्स्यालय ते महासागरापर्यंतची संघर्षयात्रा

## मानव आणि जलचरांमधील वास्तववादी भावनीक द्वंद्व !

**अलीकडे 'तरुण पिढीने रंगभूमीकडे पाठ फिरवली आहे' असे कानावर पडत होते, आणि अशी ओरड कायम केली जाते. अर्थात, काही अंशी त्यात तथ्य देखील आहे. त्यामुळे हल्ली बरीच नाटकं तरूण पिढीला आकर्षित करतील आणि त्यांना जवळची वाटतील अशा विषयांवर सादर होत आहेत. असेच एक नाटक तरूण प्रेक्षकवर्गाला नाट्यगृहात खेचून आणण्यात आणि त्यांच्यात नाटकाची गोडी निर्माण करण्यात यशस्वी ठरत आहे. तरुणाईला नाटकाकडे वळवायचे असेल तर काळानुसार नाटकाच्या विषयांमध्येही नाविन्य आणि समर्पकता आणली पाहिजे; हा एकमेव विचार मनाशी बाळगत पर्यावरण, प्रदूषण आणि प्राणी प्रेमाचा पुरस्कार करणारं नाटक म्हणजे 'ऑरी!' महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित ६४व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात दि. १७ नोव्हेंबर रोजी सादर झालेल्या या नाटकाच्या प्रयोगाने प्रेक्षकांच्या टाळ्या आणि भरघोस दाद आपल्या पदरी पाडून स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलंय. सुरेश शांताराम पवार लिखित आणि त्यांनीच दिग्दर्शित केलेल्या 'ऑरी' या नाटकात सुरेश पवार हे स्वतः 'ऑरी' कासवाच्या मुख्य भुमिकेत आहेत. ते कल्याण डोंबिवली महापालिका कर्मचारी असून त्यांच्यासह इतर पालिका कर्मचारी, आणि स्थानिक हौशी कलावंतांनी साकारलेल्या भूमिकांमधून आपण खरोखरच मत्स्यालयात आहोत, असा भास प्रेक्षागृहात होतो. अर्थात याचे निर्विवाद श्रेय रंगमंच सजावटकार, म्युझिक आर्टिस्ट, प्रकाश व्यवस्था आणि आचार्य अत्रे रंगमंदिराच्या व्यवस्थापनाला द्यायलाच हवं; कारण रंगभूमिवर मत्स्यालय आणि महासागर हुबेहूब साकार करण्याच कौशल्य या टीमनं करुन दाखवलं आहे. आजच्या एआय अन् थ्रीडी च्या युगात आधुनिक तंत्रज्ञानालाही लाजवेल असा रंगभूमिवरील खराखुरा महासागर आणि त्यातील सागरी जीवन अनुभवायचे असेल तर प्रेक्षकांनी हे नाटक जरूर पहावं. कल्याण डोंबिवली महापालिकेतील कर्मचाऱ्यांनी या नाटकात अनेक भूमिका केल्या आहेत. अगदी बाल कलाकारापासून ते जेष्ठ कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांनीच साकारलेल्या भूमिकेतून त्यांच्यातील कलेचं दर्शन तर होतंच; पण त्यांची प्राणी प्रेमाची आणि निसर्ग संवर्धनाची तळमळही प्राकर्षानं दिसून येते.**

या नाटकात लेखकानं 'ऑरी' नावाच्या कासवाची व्यथा मांडली असून मुक्त जीवन जगण्यासाठी त्याची तळमळ आणि त्याकरता मत्स्यालयापासून ते महासागरापर्यंतच्या प्रवासाची भीषण वास्तविकता दाखवण्याचा प्रयत्न केलाय. मत्स्यालय असो, प्राणिसंग्रहालय असो किंवा अत्ताच्या काळातील जंगले... प्राणी कुठेही सुरक्षित नाहीत हे दाखवण्यासाठी लेखक दिग्दर्शक आणि विशेषतः वेशभुषाकारांनी आपलं सारं कौशल्य पणाला लावलं आहे.

सुप्रसिद्ध जापानी लेखक ताजिमा शिंजी यांच्या कादंबरीवर आधारित "ऑरी" हे दोन अंकी नाटक म्हणजे मत्स्यगृहात लोकांच्या मनोरंजनासाठी वैद्द करून ठेवलेल्या एका कासवाची करूण कथा आहे. मत्स्यालयाच्या काचपेटीतील बंदिस्त जीवनाला कंटाळलेल्या कासवाची सागरातील मुक्त जीवन जगण्यासाठी केलेली भावनीक धडपड म्हणजे ऑरी! 'जोजो' नावाच्या छोट्या माश्याने ऑरीची व्यथा व त्याची मुक्त जीवन जगण्याची मनिषा त्याच्या इतर सहकारी माशांना सांगितल्यानंतर सगळे जलचर ऑरी कासवाला मत्स्यालयातून बाहेर काढण्याचा व त्याला पुन्हा समुद्रात घेऊन जाण्याचा कसा प्रयत्न करतात आणि त्यात ते यशस्वी होतात का? हे या नाटकाचे गूढ असलं तरी कासवाला मुक्त करण्यासाठी एका खेकड्याची मदत घेतली जाते; हे विशेष ! मुळात जो खेकडा स्वतः मत्स्यालयात बंदिस्त आहे तो एका कासावची सुटका कशी करतो ? हीच या नाटकाची खरी गंमत आहे. मत्स्यगृहातून ऑरीला बाहेर पडण्यासाठी अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो, आजारपणाचे ढोंग, अन्नत्याग, उपासमार, अनावश्यक इंजेक्शन आणि औषधांचा त्रास अशा



> **आज मानवाच्या विविध प्रयोगांमुळे धरती सुरक्षित नाही... आभाळ सुरक्षित नाही... समुद्रही सुरक्षित नाही, हे वास्तव मांडण्याचा प्रयत्न या नाटकाद्वारे केला आहे त्यासाठी प्रतीकात्मक समुद्री जीव, मासे, खेकडा, कासव इत्यादी व मानवांचा क्षणोक्षणी बदलणाऱ्या मतलबी वृत्तींचा भावनांचा विचित्र खेळ दाखवताना आपण त्यांच्या नैसर्गिक जगण्याला का धक्का लागू नये हे या नाटकाद्वारे सांगण्याचा प्रयत्न आम्ही ऑरीद्वारे केला आहे**
>
> **- सुरेश शांताराम पवार (लेखक तथा दिग्दर्शक)**

अनेक गोष्टींचं बलीदान करावं लागतं यातून त्याची स्वैर जीवन जगण्याची गहन तळमळ दाखवण्यात लेखक यशस्वी झालाय. मुळात एखाद्या कथेला फुलवण्याचे कार्य दिग्दर्शकाकडे असते, मात्र कथानकात एकापेक्षा जास्त ट्रॅक असताना ते कथानक गुंफून ठेवण्याची जबाबदारी ही दिग्दर्शकाकडे येते. ती जबाबदारी देखील दिग्दर्शकांनी लीलया पार पाडली आहे. त्यामुळेच या नाटकाला टाळ्यांच्या कडकडाटातून मिळालेली रसिक प्रेक्षकांची दाद हे अत्यंत प्रशंसनीय अशा दिग्दर्शनाचं मोठं कारण म्हणता येईल. नेपथ्यातील नेमकेपणा आणि प्रकाश योजनेचा प्रभावी वापर करून जिव्हाळ्याचे वातावरण तयार करण्यात ऑरीला यश आले आहे. उत्तम संवाद कौशल्यामुळे पात्रांच्या भावनिक कोंडीकडे प्रेक्षकांचे लक्ष वेधले जाते. कौतुकाची गोष्ट म्हणजे नाटकाचा विषय जरी तरुण पिढी आणि पर्यावरणवाद्यांना केंद्रस्थानी ठेवून मांडण्यात आला असला तरी; नाटकाला सर्वच वयोगटातील आणि स्तरातील प्रेक्षकांची जोरदार हजेरी पाहायला मिळाली. ऑरीच्या कलाकारांनी आपापल्या भूमिकांना योग्य तो न्याय देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. परंतु काही प्रसंगी कलाकारांच्या सादरीकरण शैलीतील उणिवा कमी अधिक प्रमाणात दिसून येतात. अर्थात सर्वच कलाकर हे महापालिका कर्मचारी असल्याने आपली दैनंदिन कर्तव्ये पार पाडत दररोज तालीम करणं हे देखील कौतुकास्पद आहे. मुक्या प्राण्यांच्या भावनांना शब्दबद्ध केल्याने कलाकारांच्या संवादांमध्ये कल्पकता आणि सहजता जाणवली. उत्तरार्धानंतर नाटकाची कथा भावनीकतेकडे वळत जाते. त्यामुळे नाटकाचा विषय थोडा अधिकच खोलात गेल्यासारखा वाटतो. ऑरी हा कमाईचं साधन असल्याने मत्स्यालयाच्या मालकाला कोणत्याही परिस्थितीत त्याला समुद्रात सोडायचं नसतं, ऑरी गेला तर आपली चांदी कशी होईल या चिंतेने संतप्त झालेल्या मत्स्यालयाच्या मालकाचा क्रोधाभिनयाने तसेच पेंग्वीन, कासवं, सीगल, यांच्या हलक्या-फुलक्या भूमिकांनी नाटकातील जिवंतपणा टिकवून ठेवला आहे. पत्रकार, प्राणिमित्र आणि समाजसेवकांच्या दबावामुळे अखेर ऑरीला समुद्रात सोडले जाते मात्र समुद्रात झालेल्या भीषण प्रदुषणामुळे तिथेही त्याची 'आगीतून फुफाट्यात' गेल्यासारखी अवस्था होते. उत्तरार्धातील ऑरीची एका लोटी नावाच्या कासविणीसोबत मैत्री होते जीला समुद्रातील अणूचाचण्या आणि सागरी प्रदुषणामुळे अंधत्व आलेलं असतं. ऑरी आणि लोटी या दोघांमधील निखळ संवाद आणि त्यातून देण्यात आलेला संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यात दिग्दर्शक यशस्वी ठरला आहे. उत्तम प्रकाशयोजनेमुळे समुद्रकिनाऱ्यावरील चांदणी रात्र आणि सोनेरी दिवस रंगमंचावर हुबेहुब साकारण्यात आले आहेत. अनेक दिवस उपाशी राहिल्याने ऑरीच्या पोटाची भूक त्याला कोणत्या पातळीवर घेऊन जाते हा या नाटकातील अत्यंत नाजूक आणि हळवा प्रसंग म्हणावा लागेल. माणूस, समुद्री जीवन, पर्यावरण आणि प्रदुषण या विषयाला केंद्रस्थानी धरून आखलेल्या या नाटकातील ४ मुख्य प्रसंग हे प्रेक्षकांना आत्ममंथन करण्यास भाग पाडतात. लेखक दिग्दर्शक, वेशभूषा आणि नेपथ्यकारांच्या मेहनतीने वास्तविकतेला धरून सादर होणाऱ्या विषयावर प्रेक्षक सखोल विचार करायला लागतात. लेखनामध्ये गंभीर विषय सुद्धा विनोदात्मक पद्धतीने मांडून एक प्रकारचा समतोल साधला गेला आहे. त्यामुळे मेंदूला चालना देणारं हे नाटक मनोरंजक सुद्धा झाले आहे. लेखकानं संहीता लिहिताना प्रत्येका पात्राला दिलेली एक वेगळी छटा चांगलीच उठून दिसते. बदलत्या काळाप्रमाणे बदलत जाणारे विचार, त्यांची मानसिकता आणि गोष्टींकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन ज्या सहजतेने प्रेक्षकांसमोर मांडला आहे त्याचे कौतुक करावेसे वाटते. २१व्या शतकातील माणसाने स्वतःच्या स्वार्थासाठी आणि महासत्ता बनण्यासाठी अत्यंत घातक अशा अणू चाचण्याकरून समुद्री जीवन धोक्यात आणलं आहे. ज्याचा सागर संपदेवर विपरीत परिणाम झाला असून तो दाखवण्याचा प्रयत्न या नाटकातून झाल्याने त्याला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. स्वार्थी माणसाला जलचरांनी दिलेल्या गंभीर इशाऱ्यावर आत्मचिंतन करण्यासाठी प्रेक्षकांनी हे नाटक जरूर पहावं. थोडक्यात मानवाने प्राण्याचा अधिवास कशापद्धतीने धोक्यात आणलाय आणि त्यासाठी प्राण्यांना कोणती किंमत मोजावी लागते ; याची हृदयद्रावक सत्यवादी कथा म्हणजे ऑरी . महत्त्वाचे म्हणजे लेखकाने नाटकातून प्रेक्षकांना कोणताही थेट उपदेश देण्याचा प्रयत्न केलेला नाही. परंतु तरीही कथेतून प्रेक्षकांना नकळतपणे बऱ्याच गोष्टी उलगडतील आणि त्यातून तो नक्कीच बोध घेईल असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**नाट्यरूपांतर आणि दिग्दर्शन**
**सुरेश शांताराम पवार**

● नेपथ्य ●
सुरेश पवार / प्रदीप पाटील
● नेपथ्य निर्माण ●
विनोद चव्हाण / सूर्यकांत यशवंतराव/आदित्य ढोबळे
● प्रकाश योजना ●
राजेश शिंदे
● संगीत ●
अभिनेश सरपडवळ
रंगभूषा उल्लेष खंदारे
● वेशभूषा ●
स्मिता पवार
● सूत्रधार ●
संजय जाधव
उप आयुक्त , क्रीडा व सांस्कृतिक विभाग कल्याण डोंबिवली महानगरपालिका

## भविष्यवेध



बुधवार
19 नोव्हेंबर 2025

**मेष**
गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो. मतभेद दूर होतील.

**वृषभ**
धार्मिक आयोजनात सहभागी व्हाल. भौतिक सुख प्राप्त होईल. विद्यार्थीच मन अभ्यासात रमेल. कौटुंबिक मतभेद दूर होतील.आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या.

**मिथुन**
योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न करा. घरातील वातावरण आनंददायी राहील. सामाजिक कामात सहयोग मिळेल.

**कर्क**
सामाजिक क्षेत्रात लाभ प्राप्तिचा योग. गूढ कार्यात यश प्राप्ति .सामाजिक क्षेत्रात धार्मिक अनुसंधानाचा योग. व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. प्रेमीजनांसाठी दिवस आनंदाने परिपूर्ण.

**सिंह**
आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. ज्या व्यक्तीकडे फुकट घालवण्यासाठी वेळ आहे त्याचे ऐकण्याचा प्रयत्न करा आणि त्याला सल्ला द्या. यश प्राप्ति होईल.

**कन्या**
योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. आध्यात्मात मन रमेल. उत्पन्न वाढीबाबत योजना बनवू शकता.

**तुळ**
व्यापार उत्तम चालेल. सामाजिक कामात सक्रिय सहयोग मिळेल. मुलांच्या तब्बेतीची काळजी दूर होईल. दिवस नवी सुरुवात करण्यास किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय ठरावण्यास साहाय्यक असू शकतो.

**वृश्चिक**
विशेष महत्वाच्या आर्थिक कामात भाग्यवर्धक यश. वित्तीय कामांसाठी विशेष यात्रा. गूढ अनुसंधान संबंधी कार्ये होतील. आवडीच्या नातलगांना भेटा व स्वतःबद्दल त्यांची प्रतिक्रिया मिळवा.

**धनु**
धर्मात आस्था वाढेल. मार्ग प्रशस्त होईल. हुशारीने गुंतवलेले धन आपणास ध्येयाजवळ घेऊन जाईल. जोखिम असलेले कार्ये टाळा. जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये.

**मकर**
सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल. नाते वाईकांशी भेट होईल. आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**कुंभ**
आरोग्य मध्यम राहील. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील. नाराजी दूर होईल.

**मिन**
नवे काम, विचार, योजना लांबणीवर ठेवा. आर्थिक विवादातून नुकसान संभव. आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र राज्याच्या प्रगतीचे आधारस्तंभ - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन व युनिडो यांच्यात हेतुपत्र वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : उद्योजक स्वतःच्या कष्टातून उद्योग उभारतात, तंत्रज्ञानाची जोड, विकासाला चालना, आधुनिक साधने यांची उपलब्धता करून दिल्यास हे उद्योजक चमत्कार घडवू शकतात. महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक लघु आणि मध्यम उद्योग असून हे क्षेत्र राज्याच्या प्रगतीचे आधारस्तंभ असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन आणि युनायटेड नेशन्स इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (युनिडो) यांच्यात डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन आणि इनोव्हेशन क्षेत्रातील सहकार्यासाठी हेतुपत्र (लेटर ऑफ इंडेट) वाटप करण्यात आले, या करारामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या स्वीकाराला गती मिळणार असून, विशेषतः एमएसएमई उद्योगांना जागतिक स्पर्धात्मकतेकडे नेण्यास मोठी मदत होणार आहे.

युनिडो ही जागतिक स्तरावर टिकाऊ आणि समावेशक औद्योगिक विकासाला पाठबळ देणारी प्रमुख संस्था आहे. तर इंडिया एसएमई फोरम (आयएसएफ) सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे प्रशिक्षण, आउटरीच आणि उद्योग स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी कार्यरत आहे. दोन्ही संस्थांच्या अनुभवाचा लाभ महाराष्ट्राला तंत्रज्ञान-आधारित औद्योगिक वाढीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

राज्यातील औद्योगिक क्षेत्र कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, एव्ही/व्हीआर, ऑटोमेशन आणि इंडस्ट्री 4.0 सारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे झपाट्याने बदलत आहे. या पार्श्वभूमीवर युनिडोच्या तांत्रिक ज्ञानाचा आधार घेत महाराष्ट्रात डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनसाठी मजबूत परिसंस्था उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मुंबई, पुणे येथे सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्याचा प्रस्ताव असून महत्त्वाच्या औद्योगिक क्लस्टर्समध्ये क्षेत्रनिहाय "स्पोक सेंटर्स" उभारले जाणार आहेत.

या संरचित मॉडेलमुळे मोठ्या उद्योग आणि एमएसएमई यांच्यातील डिजिटल दरी कमी होईल, औद्योगिक व्हॅल्यू चेन मजबूत होईल आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढेल. तसेच राज्याच्या इनोव्हेशन-ड्रिव्हन आणि टिकाऊ आर्थिक विकासाच्या उद्दिष्टांना मोठी गती मिळणार आहे.

# रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भाजपा जुने कल्याण शहर जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : भारतीय जनता पार्टी जुने कल्याण शहरअध्यक्ष अमित धाक्रस यांच्या भाजपा शहर जनसंपर्क कार्यालयाचे उद्घघाटन भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याहस्ते संपन्न झाले. या प्रसंगी रवींद्र चव्हाण यांनी सर्व कार्यकर्त्यांना शहर कार्यालयाच्या उद्घघाटन प्रसंगी शुभेच्छा दिल्या. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या येणाऱ्या निवडणुकीसाठी सर्वांनी अहोरात्र मेहनत करून भारतीय जनता पार्टीला जास्तीत जास्त यश मिळवून देण्यासाठी आवाहन केले.



या शहर कार्यालय उद्घघाटन प्रसंगी माजी आमदार नरेंद्र पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष नंदू परब, भाजपा निवडणूक प्रमुख नरेंद्र सूर्यवंशी, माजी जिल्हाध्यक्ष शशिकांत कांबळे, बेटी पढाव संयोजिका शुभा पाध्ये, प्रदेश प्रतिनिधी डॉक्टर तांबडे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस निखिल चव्हाण, माजी जिल्हा सरचिटणीस प्रेमनाथ म्हात्रे, भाजपा नवीन शहर अध्यक्ष स्वप्निल काठे, भाजपा मध्य शहर अध्यक्ष रितेश फडके, मांडा टिटवाळा मंडळ अध्यक्ष शक्तिवान भोईर, माजी नगरसेवक वरूण पाटील, अर्जुन भोईर, अनिल पंडित, सचिन खेमा, संतोष तरे, दया गायकवाड, माजी परिवहन समिती सदस्य कल्पेश जोशी तसेच सर्व माजी नगरसेवक व भाजपा पदाधिकारी, महिला पदाधिकारी युवा मोर्चा पदाधिकारी तसेच कार्यकर्ता उपस्थित होते.

भाजपा शहर कार्यालयाचे उद्घाटनाचे औचित्य साधून येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे कार्याध्यक्ष मोरेश्वर तरे यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये चव्हाण यांच्याहस्ते पक्ष प्रवेश करण्यात आला. तसेच भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते प्रशांत माळी यांची भाजपा जूने कल्याण शहर सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली. याप्रसंगी पक्षाकडून सर्वांचे आभार व्यक्त केले.

# रिक्षा-टॅक्सी चालकाच्या प्रामाणिकपणामुळे मिळाला मोबाईल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : शिव परिवार संचलित शिव परिवार रिक्षा-टॅक्सी कल्याण समितीचे शिवदूत अमरेश कुमार पांडे यांनी प्रामाणिकतेचे उज्वल उदाहरण घालून समाजासमोर आदर्श ठेवला आहे. रिक्षामध्ये सापडलेला अंदाजे 20,000 किमतीचा मोबाइल फोन त्यांनी कसलीही अपेक्षा न ठेवता त्याच्या खऱ्या मालक कैलाश वाल्मीकि यांना सुरक्षितरित्या शिवशांती प्रतिष्ठानच्या कार्यालयात परत केला.



**20,000 किमतीचा मोबाइल फोन रिक्षाचालकाकडून परत**

यावेळी मालक वाल्मीकी यांनी अमरेशजींच्या या कृतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांचे मनापासून आभार मानले. यावेळी शिव परिवार व शिवशांती प्रतिष्ठानचे संस्थापक ॲड. विनय कुमार सिंह यांनी अमरेश पांडे यांचा सार्वजनिक गौरव केला. या प्रसंगी ते म्हणाले,"अमरेशजींनी शिव परिवारातील रिक्षा चालक बांधवांचे नाव उज्वल केले आहे. त्यांच्या प्रामाणिक कृतीमुळे समाजात विश्वास आणि मानवता अधिक दृढ होते." शिव परिवारातील इतर शिवदूतांनीही या उपक्रमाचे स्वागत करत सांगितले की, समितीच्या प्रामाणिकता, सेवा आणि समाजनिष्ठा या मुल्यांना बळकटी देणारी ही घटना सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. रिक्षा-टॅक्सी चालक बांधवांना अशाच सकारात्मक कृतींसाठी प्रोत्साहित करण्यात आले.

# एका दैवी खेळाडूची वादळी खेळी

२००९-१०ची गोष्ट. जवळपास २१ वर्ष आपल्या खांद्यावर टीमचा डोलारा सांभाळणारा त्यादिवशी देखील तेच काम करत होता. ३५०-धावांचा आव्हानाचा पाठलाग करत असताना तो ऑसी बॉलर्सची धुलाई करत होता. त्यावेळी २१ वर्षाचाच एक स्वतःच्या वाढदिवशी युवक हे सगळं पाहत होता. ड्रेसिंग रूममधल्या सुचना आणी ड्रिंक्स बॉटल तो त्या माणसाला देत होता. तेंडुलकरची अपयशातली ती सर्वोत्कृष्ट खेळी होती पण ते अपयश तेंडुलकरमुळे आलं नाही हे देखील तो जाणुन होता. भारत लढायला शिकला पण जिंकणं अजुन बाकी आहे हे त्याला उमगलं आणि मोठं आव्हान पार करायचं असेल तर आपणच खंबीरपणे उभे राहुन टीमला विजयी करायचं ही खूणगाठ त्याने बांधली.

ही खूणगाठ त्याने बांधली नाही तर ती सत्यात देखील उतरवली ते सुध्दा सचिनच्या समोर. एका महिन्यात दोन क्लासिक इनिंग खेळुन गेला होबार्टला लंकेविरूध्द आणि आशिया कफला पाकिस्तान विरूद्ध. ती पाकिस्तानची मॅच तेंडुलकरची अखेरची वनडे होती.. त्यादिवशी ओळख मिळवुन देणाऱ्या आणि सचिनला शांतपणे निवृत्ती घेऊन देणाऱ्या खणखणीत १८३ रन वाजवल्या होत्या.

आजच्या घडीला तो सर्वोत्तम व्हाईट बॉल क्रिकेटर आहे. सर्व आयसीसी टुर्नमिंट काबिज केलेला महारथी. कुणी चेस मास्टर म्हणतं कोणी किंग. त्याने अनेक रेकॉर्ड मोडले, काही नव्याने लिहले.. १८ वर्ष एका टीमशी एकनिष्ठ राहुन विजेतेपद पटकावले.. विराट रनमशीन कोहली. करियर बाबत फार सिरीयस नसणाऱ्या, मस्तीखोर विराट कोहलीचं 'त्या' मॅचनंतर एक सिरीयस क्रिकेटर म्हणून नाव घेतलं जाऊ लागलं होतं...

२०११-१२ भारतीय टीमसाठी कसोटी क्रिकेटचा कठीण काळ होता. मायदेशात इंग्लंडकडुन पराभव पत्करावा लागला. आफ्रिका ऑस्ट्रेलियाने धुव्वा उडवला. कोहली त्या काळात टेस्ट प्लेयर म्हणून उदयास येत होता आणि ऑल फॉर्मेट प्लेयर बनण्याकडे वाटचाल सुरू होती. भारतीय टीम संक्रमणावस्थेतून जात होती. द्रविड-लक्ष्मण-सचिन-झहीर निवृत्तीकडे जात होते. धोनीच्या कामगिरीवर प्रश्नचिन्हं उभं होत. त्याने आपल्या पहिल्याच ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर ॲडलेडला खणखणीत शतक ठोकत टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले.

आज विराट कोहली वनडे शतकांच बादशहा झालाय. पण त्याच्या सर्वोत्तम आणि खऱ्या अर्थाने मॅच विनिंग खेळी अनुक्रमे ३५, ४३*, ७६ धावांच्या आहेत. तिन्ही ठिकाणी टॉप ऑर्डर लवकर माघारी परतली होती. प्रतिस्पर्धी संघ दबाव निर्माण करण्यात यशस्वी झाला होता. मुंबई, ट्रेंट ब्रिज, बार्बोडस. वेगवेगळ्या कंडिशन्स, वेगवेगळा कालावधी. तिन्ही ठिकाणी फायनल मॅच, मॅच फसलेली. तिथे हा माणूस धीरोदात्तपणे उभा राहिला. पार्टनरशिपम आणि इतिहास रचण्यात त्याने मोलाची भुमिका पार पाडली.

धावांची भूक, अफाट मेहनत करण्याची इच्छा, आपलं आवडते छोले भटुरे चिकन बिर्यानी त्याग करण्याची दृढता त्याच्या यशाचा भक्कम पाया रचला गेला. मोहालीपासुन मेलबर्न, कोलकत्ता ते केपटाऊन तो सगळीकडे गाजला. वनडे असो किंवा टी20, टेस्ट असो किंवा आयपीएल त्यांची झोकून देऊन खेळण्याची काम करण्याची वृत्ती त्याला इतर खेळाडुंमधला फरक मैदानावर आणि रेकॉर्डबुक्समध्ये दिसतो.

कोहलीने टेस्ट कर्णधारपदाची सुत्रे हाती घेतल्यापासून (पाकिस्तान सोडल्यास, कारण ते कोहली कर्णधार झाल्यापासून कसोटी सामना खेळले नाही) सर्वांना मायदेशात धूळ चारली आहे. इंग्लंड, आफ्रिका तर दोनदा पराभुत झाली आहे. कोहलीने कर्णधार झाल्यानंतर सगळ्यात पहिले आपला बॉलिंग अटॅक भक्कम, धारदार करण्यावर भर दिला. जे गोलंदाज वीस विकेट घेऊ शकतील अशा गोलंदाजांवर विश्वास दाखवला. अजिंक्य रहाणे, मोहम्मद सिराजसारख्या खेळाडुना चांगली कामगिरी करण्यासाठी प्रेरित केले.

एका स्पेशल टॅलेंट असलेल्या खेळाडुने ग्रेटेस्ट स्टॅण्डर्ड सेट करून ठेवला आहे. कारण आज वनडे क्रिकेट ज्या अवस्थेत आहे त्याचा विचार केल्यास जर एखाद्या खेळाडूने वनडे क्रिकेटला प्राथमिकता दिली तरच त्याने या विक्रमाचा विचार करावा नाहीतर टी20 क्रिकेट/ फ्रेंचाईज क्रिकेटचा रस्ता धरावा. फ्रेंचाईज क्रिकेटचा विषय निघालाच आहे तर कोहलीला आयपीएलसाठी खेळावं लागतं आणि आयपीएल शारिरीक दृष्टीने थकवतं त्यापेक्षा कीबोर्ड वॉरियरमुळे मानसिक दृष्टीनेजास्त थकवतं. सोशल मिडीयाच्या जमान्यात सर्व ट्रोल, मीम यांना पॉझिटिव्हली घेत त्याचा खेळावर परिणाम होऊ न देता दोन वर्षांनी कमबॅक करणं सोपं नव्हते. सचिनला द सचिन होण्यात सोशल मीडिया नसण्याचा फार मोठा वाटा होता. पाकिस्तानला हरवून गावस्करला देखील नाचायला भाग पाडलं त्याने ते केलं. म्हणून तो स्पेशल आहे.

सतरा वर्षाची कारकीर्द एका लेखात मांडणं कठीणच. त्याने चेसिंग करणं हे बाजारातुन न्युजपेपर आणण्यासारखं सहज आणि नित्यनेमाने केलं. त्याला ना फॉर्मेटचं बंधन होतं ना प्रतिस्पर्धी टीमचं। परिस्थिती बिकट असली की उलट त्याच्या बॅटिंग स्किल्सला आणखी धार येते. २०१६ पाकिस्तान विरूद्ध आशिया कप आठवा, इंग्लंडमधलं एजबॅस्टनचं शतक पहा, डोक्यावर आदळलेल्या बाऊन्सर नंतर दोन्ही डावात केलेली शतकं आणि टीमचा बदलवलेला माईंडसेट.

टीम आणि फॅनक्लबमध्ये क्रिकेटप्रेमी विभागले गेले त्या अनुषंगाने विराट कोहली भारतीय क्रिकेटचा अखेरचा सुपरस्टार आहे. बेदी,गावस्कर, तेंडुलकर, धोनी यांनी तयार केलेली भारतात क्रिकेटची आवड वाढवली. कसोटी क्रिकेटला एक खेळाडू म्हणून एक कर्णधार म्हणून नवसंजीवनी दिली. भारतीयांची क्रिकेटची गोडी टिकवण्याचं कार्य त्याने यथाशक्ती प्रामाणिकपणे पार पाडले. आणि तेच त्यांचं नावाप्रमाणे विराट योगदान आहे..

**- वरद सहस्त्रबुद्धे**

# पत्रकार मंगल डोंगरे यांचा उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष पुरस्काराने गौरव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड व्हॉईस ऑफ मिडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेचे दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ व १७/११/२०२५ रोजी चौथे राज्य शिखर अधिवेशन पंढरपूर येथे पार पडले.यावेळी मोठ्या संख्येने पत्रकार बंधु या अधिवेशनासाठी उपस्थित होते. याप्रसंगी संघटनेसाठी अमूल्य वेळ देऊन संघटना वाढीसाठी विशेष कामगिरी बजावणाऱ्या राज्यातील पाच उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष व पाच तालुका अध्यक्ष यांचा राज्यपाल हरीभाऊ बागडे यांच्या शुभ हस्ते पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात आला.त्यात कोकण - मुंबई विभागातून ठाणे जिल्हा अध्यक्ष तथा व्हॉईस ऑफ मिडिया चे ठाणे जिल्हा सुप्रीमो मंगल डोंगरे यांना ही राज्यपाल हरीभाऊ बागडे यांच्या हस्ते उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष म्हणून पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

मंगल डोंगरे हे गेल्या पंचवीस वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात काम करत असून त्यांचे अतिशय चांगले असे संघटन कौशल्य,,दांडगा अनुभव, समाजातील परिचय, परोपकाराची भावना,तसेच पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी असलेली तत्परता, त्यांच्या ह्या गुणांमुळे आतापर्यंत त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. तर आज प्रत्यक्षात दस्तुरखुर्द महोदय राज्यपाल हरीभाऊ बागडे यांच्या शुभ हस्ते अत्यंत मानाचा व महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पांडुरंगाच्या पंढरपुरात उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष म्हणून पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर समाजातील सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# पेण नगरपालिकेची निवडणूक रंगतदार होणार

## नगराध्यक्षासाठी ५ तर सदस्यांसाठी १०३ उमेदवार रिंगणात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : रायगड जिल्ह्यातील पेण नगरपालिकेची निवडणूक रंगतदार होणार असे चित्र स्पष्ट झाले आहे नगराध्यक्ष पदासाठी ५ अर्ज तर १२ प्रभागातील २४ जागांसाठी १०३ नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले आहेत.

पेण नगरपालिका निवडणुकीमध्ये आजी माजी नगरसेवकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असून नव्या चेहऱ्यांना यावेळी सर्वच पक्षांनी संधी दिली आहे एकंदरीत पाहता प्रभाग एक ते बारा मधील २४ जागांसाठी अत्यंत चुरशीची आणि रंगतदार निवडणूक होणार असल्यामुळे पेणकरांसाठी ही एक पर्वणीच ठरणार आहे.

नगराध्यक्ष पदासाठी महिला आरक्षित असल्यामुळे यावेळी पाच महिलांनी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

मागील सर्व निवडणुकीचे रेकॉर्ड मोडून काढून यावेळी कोणत्याच पक्षाला ही निवडणूक सोपी जाणार नसून अनेक पक्षांमध्ये पक्षांतराचे वारे निर्माण झालेले पहावयास मिळाले आहे. भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे गट, अजित पवार राष्ट्रवादी गट ,संतोष श्रृंगारपुरे यांची विकास आघाडी, शिशिर धारकर यांची आघाडी, कॉंग्रेस ,मनसे निवडणुकीत उतरली असल्यामुळे यावेळी ही निवडणूक चुरशीची आणि रंगतदार होईल यात तीळमात्र शंका नाही. प्रत्येकाने आपलं शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. पेणकरांनी ज्या ज्या वेळी या सर्वांना साथ दिली त्या त्यावेळी ही निवडणूक जिंकणं सोपं झालं मात्र मागील निवडणुकीमध्ये जी युती झाली त्यांनी स्वतंत्रपणे उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत .एकंदरीत पाहता पेणकरांसाठी ही निवडणूक अत्यंत चुरशीची व रंगतदार झालेली पहावयास मिळेल यात शंका घेण्याचे कारण नाही.

# हिंदु जनजागृती समितीच्या मोहिमेत धर्मप्रेमी युवकांचा उत्स्फूर्त सहभाग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण:** इतिहास, संस्कृती आणि राष्ट्रभावनेची जपणूक हा उद्देश ठेऊन हिंदु जनजागृती समितीच्या वतीने गडसंवर्धन मोहीम किल्ले सांकशी (ता. पेण) येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या मोहिमेत ८० हून अधिक युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

हिंदु जनजागृती समितीचे सुनील कदम यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांनी राष्ट्र आणि धर्मरक्षणासाठी केलेल्या महान कार्यातून राष्ट्र आणि धर्मकार्य करण्याची प्रेरणा मिळावी तसेच गडांचे ऐतिहासिक महत्त्व आणि संवर्धन याबद्दल जनजागृती व्हावी हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. रायगड जिल्ह्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. गड-किल्ले मोहिमेत सहभागी झाल्यावर आपली क्षमता कळते तसेच ती वाढवण्याची प्रेरणाही मिळते. आपले दैनंदिन जीवन आदर्श घडवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचे आदर्श डोळयासमोर ठेऊन कृती करूया'.



या मोहिमेत सांकशी किल्ल्यावरती साफसफाई, प्लास्टिक व कचरा गोळा करण्यात आला. तसेच युवकांमध्ये आत्मविश्वास आणि स्वतःचे रक्षण करण्याची मानसिकता निर्माण व्हावी यासाठी गडाच्या पायथ्याशी कराटे, लाठीकाठी, दंडसाखळी यांचे प्रशिक्षण आणि स्वरक्षा प्रात्यक्षिके घेण्यात आली. या प्रशिक्षणाद्वारे तरुणांनी स्वतःचे आणि राष्ट्राचे संरक्षण करणे हा संदेश देण्यात आला. सहभागी सर्व युवक-युवतींनी या मोहिमेतून प्रेरणा मिळाली तसेच पुढेही अशा मोहिमांत सहभाग घेऊन राष्ट्र आणि धर्मकार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

# चोरीला गेलेली इनोव्हा क्रिस्टा गाडी राजस्थानातून हस्तगत!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : वासिंद पासून काही अंतरावर असलेल्या पाच्छापूर या गावातील चोरीला गेलेली इनोव्हा क्रिस्टा गाडी पोलिसांनी राजस्थान येथून हस्तगत करुन एका आरोपीलाही ताब्यात घेतल्याची दमदार कामगिरी केली आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 15 जुलै 2025 रोजी रात्रीच्या वेळेस पाच्छापूर गावातील रोहीत तानाजी भोईर यांची इनोव्हा क्रिस्टा गाडी चोरीस गेली होती. याबाबत पडघा पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंद करुन तपास सुरू केला होता. या प्रकरणी ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डी.एस. स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे, पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी जितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला होता.



दरम्यान, पोलिस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे पोलीस उपनिरीक्षक शरद सुरळकर, पो.ह.दर्शन सावळे, विनोद म्हस्के, सुरेश खडके या पथकांनी तपासणी कामी कार्यकुशलता दाखवून राजस्थान राज्यातील बाडमेर जिल्ह्यातील गुडामालानी येथून एका आरोपीला ताब्यात घेतले व त्याची कसून तपासणी केली असता या भागात लपवून ठेवण्यात आलेली चोरीलेली ही गाडी हस्तगत केली आहे. तर या चोरीच्या प्रकरणातील अजून दोन आरोपी फरार असून पुढील तपास पोलीस करीत आहेत लवकरात लवकर त्यांनाही ताब्यात घेतले जाईल असे या पथकांनी सांगितले.

# एलआयसी मार्फत नाना टिळक विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण एज्युकेशन सोसायटीच्या नाना टिळक प्राथमिक विद्यालय वावोशी या प्रशालेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना एलआयसी शाखा खोपोली मार्फत मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी एलआयसीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव आश्विनी गुरव व सौ अर्चना नायर हे उपस्थित होते.तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या घरत, सहशिक्षिका मानसी केदारे आरती पाटील रिया वालम सुनील पवार आदी उपस्थित होते. यावेळी एलआयसीमार्फत शालेय विद्यार्थ्यांना वह्या, कंपासबॉक्स रंगपेटी चित्रकला वही ,पेन्सिल बॉक्स ,खाऊ यासह अनेक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. एलआयसी मार्फत सौ अश्विनी गुरव यांनी पालकांना मार्गदर्शन केले.एल.आय.सी.ने आयोजित केलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप केल्याबद्दल सौ.विद्या घरत यांनी आभार व्यक्त केले.





# कोस्टल रोड प्रकल्प स्थानिक शेतकऱ्यांच्या मुळावर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** ठाण्याची वाहतुक व्यवस्था अधिक सक्षम व्हावी यासाठी ठाण्यात राज्य शासनाच्या वतीने कोस्टल रोड प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे शेतकरी भूमिहीन होणार असेल, स्थानिकांचा रोजगार बंद होणार असेल तर हे काम बंद पाडू, असा इशारा शिवसेनेचे विभाग प्रमुख रवी घरत यांनी दिला आहे.

या प्रकल्पाचे काम सुरु असलेल्या ठिकाणी श्री.घरत यांनी शेतकऱ्यांसमवेत जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला. या प्रकल्पात परप्रांतीयाना रोजगार मिळाला मात्र ज्यांनी जमिनी कसल्या त्या शेतकऱ्यांना मात्र रोजगार मिळालेला नसून शेतकऱ्यांना मोबदला आणि रोजगार न मिळाल्यास काम बंद पाडण्याचा इशारा घरत यांनी दिला आहे. यासंदर्भात ते राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची देखील भेट घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## हातात काम नव्हे, वही- पेन हवी युवा संस्कारची भूमिका



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : बालदिनानिमित्त देशभरात विविध उपक्रम होत असताना, वास्तव मात्र वेगळे चित्र दाखवते. आपल्या समाजात अजूनही मुलं बालमजुरी करताना, बालविवाहाच्या विळख्यात सापडताना आणि शाळेबाह्य मुलांची संख्या वाढताना दिसतात. हेच मुलं आपलं उद्याचं भविष्य आहेत, आणि त्यांचं बालपण सुरक्षित करणं ही सामूहिक जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर युवा संस्कार बहुउद्देशीय संस्था सतत मुलांच्या शिक्षणासाठी कार्यरत आहे. 2009 पासून संस्था वंचित व आदिवासी पाड्यांतील मुलांना शैक्षणिक मदत पुरवत आहे. शाळेच्या पहिल्या दिवसापासून ते रोजगारापर्यंत मुलांच्या शिकण्याच्या प्रवासात सातत्यपूर्ण साथ देण्याचे काम युवा संस्कार करत आहे.2016 मध्ये संस्थेची अधिकृत नोंदणी झाल्यानंतर शिक्षण आनंददायी, मुक्त आणि मुलांच्या उपजत क्षमतेला जागवणारं बनवण्यावर विशेष भर देण्यात आला. संस्थेचे तत्त्व एकच हातात काम नको, हातात वही- पेन हवी.

युवा संस्कारचं मुख्य उद्दिष्ट म्हणजे मुलांना त्यांच्या क्षमतेची जाणीव करून देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि त्यांना उज्ज्वल भविष्याकडे नेणाऱ्या शैक्षणिक प्रवासात भक्कम पायाभरणी करणे. बालदिनानिमित्त, युवा संस्कारचे आवाहन प्रत्येक मूल शाळेत जावं, शिकावं आणि बालपण पुन्हा उजळून निघावं हेच आहे.

## संकल्प संस्था आयोजित सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सामाजिक क्षेत्रात कायमस्वरूपी नवनवीन उपक्रम करणाऱ्या व सामाजिक कार्यकर्त्यांची मातृसंस्था म्हणून ओळखली जाणाऱ्या संकल्प संस्थेच्या वतीने आयोजित सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाच्या पाचव्या बॅचचा उद्घाटन समारंभ रविवारी पंत वालावलकर स्कूल, नेहरू नगर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित अक्षयशक्ती फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नारायण अय्यर व मैत्री संस्थेचे अध्यक्ष सुरज भोईर यांच्याहस्ते संकल्प संस्थेचे अध्यक्ष विनोद हिवाळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेह कासारे यांनी पहाडी व भारदस्त आवाजात सादर केले तर सविता हेंडवे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. पाहुण्यांचा परिचय वनिता सावंत यांनी करून दिला तसेच दीपा गमरे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. स्वाती पाटील आणि वनिता सावंत यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमाला मंत्रमुग्ध करणारी सुरेल अशी सुरुवात मिळाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे डॉ. अय्यर आणि सुरज भोईर यांनी आपल्या मनोगतातून प्रशिक्षणार्थींना सामाजिक कार्यकर्त्यांची जबाबदारी अधोरेखित करत समाजविकासासाठी संवेदनशीलतेने आणि प्रामाणिकपणे काम करण्याचे आवाहन केले. प्रशिक्षणाच्या माध्यमातून सक्षम कार्यकर्त्यांची निर्मिती व्हावी, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. उद्घाटन सोहळा यशस्वी करण्यात अथक परिश्रम घेणाऱ्या स्वाती पाटील, सोनाली कांबळे, अविनाश पाटील आणि सूर्यकांत चव्हाण यांचे तसेच प्रशिक्षणार्थी व उपस्थितांचे आभार मानून सुवर्णा बामणे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

# कल्याणमध्ये वाहनचालकांवर तिसऱ्या डोळ्याची नजर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शहरातील वाहतुकीची शिस्त सुधारण्यासाठी कल्याण वाहतूक पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने राबवलेल्या मोहिमेत मोठा नियमभंगाचा पाढा समोर आला आहे. पश्चिमेकडील प्रमुख चौक, सिग्नल आणि गर्दीच्या भागात लावलेल्या अत्याधुनिक कॅमेऱ्यांतून जानेवारी ते ११ नोव्हेंबर या कालावधीत तब्बल ३३ हजार ८१९ वाहतूक नियमभंग स्पष्टपणे टिपले गेले आहेत. या सर्वांवर ३ कोटी ४५ लाख ७६ हजार ६०० रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली. 'केडीएमसी' ने बसवलेल्या आधुनिक सीसीटीव्ही नेटवर्कमुळे हेल्मेट न घालणे, सिग्नल तोडणे, कागदपत्रे नसणे, मोबाइलवर बोलणे, चुकीचे पार्किंग, धोकादायक ड्रायव्हिंग आदी गुन्हे तत्काळ कॅमेऱ्यात कैद होतात. फुटेज मिळताच कल्याण वाहतूक विभागाकडून ऑनलाइन पद्धतीने कारवाई करण्यात येते. ई-चालान जारी केले जात असून नियमभंगावर तत्काळ कारवाई केली जाते.



**मुख्य नियमभंग व आकारलेला दंड रुपयांत**

| | | |
|---|---|---|
| विनाहेल्मेट | १०,६७० प्रकरणे | १,०६,६००० |
| काळी फिल्म | ८९ प्रकरणे | ९५,५०० |
| सिग्नल तोडणे | ६,५३५ प्रकरणे | ५९,०४,५०० |
| प्रवेश निषेध | ४,०८९ प्रकरणे | २६,९७,५०० |
| विना सीटबेल्ट | ३,३३२ प्रकरणे | ३३,१४००० |
| आरसा नसणे | ४४६ प्रकरणे | ३,३६००० |

**पश्चिम भागात ८७ कॅमेरे कल्याण पश्चिम विभागात ८७अत्याधुनिक कॅमेरे 'केडीएमसी'कडून लावण्यात आले आहेत. कल्याण वाहतूक विभागाकडून शहरातील मुख्य चौकात कॅमेऱ्याच्या मदतीने कारवाई केली जाते.**

**सीसीटीव्ही कॅमेरे नजर ठेवत असल्याने पुरावे मिळतात. हेल्मेट, सीटबेल्ट, सिग्नल नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.**

- मिलिंद झोडगे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, कल्याण शहर वाहतूक शाखा.

## शारदा इंग्लिश मिडीयम शाळेच्या विद्यार्थ्यांची कराटे स्पर्धेत राज्यस्तरावर धवल कामगिरी !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)** : वासिंद येथील विद्या विकास मंडळ संचलित शारदा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या विद्यार्थ्यांनी कराटे स्पर्धेत राज्य स्तरावर धवल कामगिरी करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

ओम साई कराटे असोसिएशन, महाराष्ट्र आयोजित राज्य स्तरीय कराटे स्पर्धा शिवाई विद्या प्रसारक क्रीडा संकुल, ठाणे येथे पार पडली. या झालेल्या स्पर्धेत शारदा शाळेतील इयत्ता सातवीतील 12 वर्ष वयोगटातील



धृती हालके 35 किलो वजन गट, हंसिका पाटील 54 किलो वजन गट, वैष्णवी महाजन 48 कीलो वजन गटामध्ये सुवर्ण पदक व उन्नती ठाकरे, माविया मेमन यांनी रौप्य पदक मिळविले. तर चौथीतील 9 वर्ष वयोगटात यज्ञिका ठाकरे सुवर्ण पदक, इयत्ता तिसरीतील 8 वर्ष वयोगटात हर्षिता महाजन रौप्य, मृणाली शेलार कांस्य व इयत्ता सहावीतील 11 वर्ष वयोगटात काव्या सोमवते हिने कांस्यपदक असे यश मिळवून या विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव लौकिक केले आहे.

यासाठी क्रीडा शिक्षक (कराटे प्रशिक्षक) दौलत चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. मंडळाचे चेअरमन विठ्ठल सातवी, सचिव रविंद्र शेलार, प्राचार्य प्रशांत जाधव सरस्वती विद्यालयाचे पर्यवेक्षक काळुराम धनगर सर, वासुदेव भोईर सर यांनी सर्व विद्यार्थी व प्रशिक्षक यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## भाऊसाहेब नेने महाविद्यालयाची स्नेहल कांबळे पी.एच.डी मिळवणारी पहिली विद्यार्थीनी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण एज्युकेशन सोसायटी ही गेली ११५ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे. प्राथमिक शिक्षणा पासून ते उच्च शिक्षणापर्यंत शिक्षणाची सोय या संस्थेने पेण सारख्या ग्रामीण भागात उपलब्ध करून दिली आहे. या संस्थेत भाऊसाहेब नेने महाविद्यालय येथे प्राचार्य म्हणून कार्यरत असलेले प्राचार्य डॉ सदानंद भास्कर धारप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. स्नेहल सुशील कांबळे यांनी मुंबई विद्यापीठाची



रसायनशास्त्र विषयातील उच्चतम पदवी विद्यावाचस्पती( Ph. D. ) मिळविली आहे.

पेण एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब नेने महाविद्यालय पेण येथे गेले दहा वर्षांपासून रसायनशास्त्र विषयातील संशोधन केंद्र सुरू आहे. याच विषयात पदव्युत्तर पदवीचे शिक्षणही मिळते . अशा ग्रामीण भागात संशोधन केंद्र सुरू असणे हे कौतुकास्पद आहे. सदरचे संशोधन केंद्र हे तत्कालीन अध्यक्ष ॲड बापुसाहेब नेने व त्यांचे सहकारी यांचे प्रेरणेने सुरू झाले . तसेच सध्याचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने व त्यांचे कार्यकारीणीतील सर्व सहकारी यांच्या प्रोत्साहनामुळे प्रगती पथावर आहे. या विद्यार्थ्यीनीचे मार्गदर्शक यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. पुढील काळात असेच यश मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या यशात रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक, महाविद्यालयांतील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी , ग्रंथालय प्रमुख आणि पेण एज्युकेशन संस्थेचे कार्यकारिणी सदस्य , मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ रविंद्र कुलकर्णी, प्र.कुलगुरु डॉ. अजय भामरे यांचेही सहकार्य लाभले असं मत मार्गदर्शक प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी सांगितले. भविष्यात अनेक विद्यार्थ्यांना हे यश मार्गदर्शक ठरेल अशी भावना व्यक्त केली.

## ब्रह्मांड संगीत कट्ट्याच्या शाखेचे उदघाटन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : गेली अठरा वर्षं सामाजिक संस्कृतिक क्षेत्रात काम करणारी ब्रह्मांड कट्टा संस्था त्याच्या अंतर्गत विविध उपसंस्था कार्यरत आहेत. त्याचाच एक भाग ब्रह्मांड संगीत कट्टा गेली आठ वर्षं संगीत क्षेत्रात कार्यरत आहे. त्याच्या विविध सहा शाखा घोडबंदर रोड ब्रह्मांड येथे दोन तर ठाणे शहर शाखा व वसंत विहार शाखा, कोलशेत ढोकाळी शाखा व कोपरी शाखा सध्या संगीत क्षेत्रात त्या त्या परिसरात कार्यरत आहेत. ब्रह्मांड संगीत कट्टयाचे प्रथम अध्यक्ष कै. अरुण दळवी काका यांच्या प्रथम पुण्यतिथीचे औचित्य साधून कळवा-खारेगाव या सातव्या शाखेचा शुभारंभ रविवार दिनांक 16 नोव्हेंबर 2025 रोजी GRMR स्टुडिओ, खारेगाव कळवा येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर शाखेचे उदघाटन संगीतकार व गायक भारत शिंदे, मनोरंजन मुंबईचे मोहन पवार व ब्रह्मांड कट्टा परिवाराचे संस्थापक राजेश जाधव, अध्यक्ष महेश जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.

कळवा - खारेगाव परिसरातील संगीत प्रेमींना एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाल्याचे प्रतिपादन प्रमुख पाहुणे भारत शिंदे यांनी केले तर गायकांना मोठ्या स्टेज वर संधी देण्याचे काम मनोरंजन मराठी करेल व कट्टयाला सर्वतो परीची मदत सहकार्य करण्याचे आश्वासन पाहुण्याने दिले. तसेच संस्थापक राजेश जाधव यांनी ब्रह्मांड संगीत कट्टयाच्या नजीकच्या काळात सामाजिक संस्कृतिक कार्याच्या विविध योजना मांडल्या. संगीत कट्टयाच्या सात शाखा सुरु करून संगीतातले सप्तसूर एकत्र आले म्हणून रसिक प्रेक्षकांनी आनंद व्यक्त केला. कळवा खारेगाव शाखेचे अध्यक्ष पद संगीत विशारद रविंद्र देसाई , सचिव नितीन सालेकर, खजिनदार अर्चना देसाई, उपाध्यक्ष उदयसिंग रावराणे तर सहसचिव राहुल टवळ यांची निवड करण्यात आली .

शुभारंभाच्या कार्यक्रमास ब्रह्मांड कट्टयाचे पदाधिकारी अध्यक्ष महेश जोशी कलासंस्कार अध्यक्षा वर्षा गंद्रे तसेच सर्व ब्रह्मांड संगीत कट्टा शाखेचे पदाधिकारी वसंत विहार शाखा अध्यक्षा व ब्रह्मांड कट्टा जनसंपर्क अधिकारी ऋजुता देशपांडे, सावन कुमार सुपे, सचिन काकडे, सचिन कोरे, अतुल पोवळे, डॉ. गिरीषा सेवक, गायत्री अय्यर तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी त्यात विवेक कदम, सुनील गांगुर्डे, दत्ता पाटील, रविंद्र फडके आणि समस्त संगीत प्रेमी शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. या प्रसंगी विभागातील कलाकारांनी सोलो डुएट अशी एकूण तीस गाणी सादर केली व रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे निवेदन अध्यक्ष रविंद्र देसाई यांनी केले तर सचिव नितीन सालेकर यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

## जी एम मोमीन कॉलेजच्या केंद्रात व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक द्वारा संचालित जी.एम. मोमिन वूमन्स कॉलेज अभ्यास केंद्र, भिवंडी यांनी १६ नोव्हेंबर रोजी बी.ए.च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी "व्यक्तिमत्व विकास" या विषयावर एक विशेष व्याख्यान आयोजित केले होते. या प्रसंगी, एस.एस. अकॅडमी भिवंडीचे संचालक साईम मोमिन यांनी व्यक्तिमत्व विकासावर प्रभावी व्याख्यान दिले. रईस हायस्कूलच्या उर्दू बसेरा हॉलमध्ये प्रथम वर्षाच्या बीएच्या विद्यार्थ्यांना संबोधित करताना मोमिन यांनी मानवी मानसशास्त्र, स्वयंशिस्त, संवाद कौशल्य, आत्मविश्वास, सकारात्मक विचारसरणी, देहबोली, पुस्तक वाचन आणि वेळेचे महत्त्व यावर आपले विचार मांडले.विद्यार्थ्यांनी व्याख्यान लक्षपूर्वक ऐकले आणि प्रमुख मुद्द्यांच्या नोंदी घेतल्या. अभ्यास केंद्राचे समन्वयक अब्दुल अझीज अन्सारी यांनी साईम मोमिनची ओळख करून दिली आणि त्यांचे पुस्तक देऊन स्वागत केले.शिक्षक सय्यद एजाज हाश्मी यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. तर खान झाकीर हुसेन यांनी सर्वांचे आभार मानले.

# करंजाडे येथे हिंदवी स्वराज्य ध्वजस्तंभ लोकार्पण सोहळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याचे प्रतीक असणाऱ्या परम पवित्र भगव्या ध्वजाचे अनावरण करंजाडे येथे श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्या माध्यमातून आदरणीय गुरुवर्य संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनातून आणि करंजाडे ग्रामपंचायत सरपंच मंगेश शेलार आणि सर्व ग्रामपंचायत कमिटी यांनी केलेल्या सहकार्यामुळे १६ नोव्हेंबर २०२५ रोजी इतिहासात नोंद राहील असा हिंदवी स्वराज्य ध्वजस्तंभ लोकार्पण सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावात संपन्न झाला.

करंजाडे शहरात प्रथमच ४० फूट उंचीचा परम पवित्र भगवा ध्वज अभिमानाने फडकवण्यात आला. या सुवर्णक्षणाचे साक्षीदार होण्यासाठी परिसरातील सर्व धारकरी बांधव,



शिवप्रेमी, महिला व सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या परम पवित्र भगव्याच्या अभिमानाने निनादलेला हा ऐतिहासिक क्षण संपूर्ण करंजाडे गावासाठी अविस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात टाटा पॉवर सेक्टर ४ येथून दुर्गामाता मंदिर, सेक्टर–३ येथे भव्य ध्वज मिरवणुकीने झाली. भारतमाता, जिजामाता, दुर्गा माता यांच्या जय घोषात आपल्या देव देश धर्माची गीते म्हणत आणि शिवगर्जनेत आणि धर्मवीर शंभूराजांच्या हिंदू धर्माच्या जयघोषात निघालेल्या या मिरवणुकीने करंजाडे परिसरात अप्रतिम उत्साह निर्माण केला.यानंतर टाटा पॉवर समोरील गार्डन येथे ध्वजारोहण करण्यात आले. भगवा ध्वज उंचावताच वातावरणात "जय शिवराय हर हर महादेव जय श्रीराम " चा गगनभेदी जयघोष घुमला. ध्वजारोहणा नंतर प्रफुल संजय पिसाळ यांचे प्रभावी शिवव्याख्यान पार पडले.शिवछत्रपतींनी केलेल्या कार्यामुळे आणि धर्मवीर शंभूछत्रपतींनी दिलेल्या बलिदानामुळे आणि हिंदवी स्वराजासाठी धारातीर्थ पडलेल्या मावळयांमुळे आज आपला हिंदू धर्म आहे आणि हा परम पवित्र भगवा ध्वज मानाने फडकतोय त्यांच्या बलिदानाची आणि कार्याची जाणीव हिंदू समाजाला व्हावी यासाठीच या भगव्या ध्वजाची उभारणी आहे हा भगवा ध्वज सर्वांना हिंदवी स्वराज्याची प्रेरणा देणारा आणि शिवकालीन मूल्यांचे महत्व याबद्दल उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.हा ध्वजस्तंभ सोहळा फक्त एका कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता, हिंदवी स्वराज्याच्या संकल्पनेचे पुनर्जागरण, स्वाभिमानाची जाणीव आणि शिवपरंपरेचा गौरव यांचे प्रतीक ठरला. पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराजांनी रोवलेल्या आपल्या मातृभूमीसाठी आणि आपल्या देव ,देश ,धर्मासाठी आपण कटिबद्ध असले पाहिजे याची शिकवण देणारा आपल्या राष्ट्रप्रती स्वाभिमान आणि अभिमान या मूल्यांचा हा ध्वज पुन्हा एकदा उच्चार करणारा ठरला.यावेळी सर्व शिवप्रेमींनी "हिंदवी स्वराज्याच्या ध्वजाखाली निष्ठेने, प्रामाणिकपणे व निडरपणे आपल्या देव देश धर्मासाठी एकत्र येवून शिवछत्रपतींनी केलेले कार्य समजतात पोचविण्याची आणि श्री शिवाजी आणि श्री संभाजी या रक्तगटाचा हिंदू समाज व्हावा यासाठी एकमुखाने शपथ घेतली.संपूर्ण करंजाडे–पनवेल परिसरातून या कार्यक्रमाचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत असून, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान करंजाडे यांच्या संघटित प्रयत्नांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024